~~ख्रिस्त जयंति सुखप्रद होवो~~

~~A Christmas Gift.~~

[redacted]

कोमस-नाटक.

(COMUS)

By The Rev. G. R. Navalkar.

BOMBAY:

The Methodist Episcopal Publishing House, Fort.

1906.

प्रस्तावना.

इंग्लंडांतील एका उमरावाचीं तीन मुलें (एक बहीण व दोन भाऊ) दूर प्रदेशांतील आपल्या आप्तमित्रांस भेटून परत येतांना हरवलीं. ह्या गोष्टीवरून मिल्टन ह्या इंग्लिश महाकवीनें एक उत्तम लहानसें नाटक तयार केलें, त्याचें हें मराठींत साधारण संविधान आहे. ह्यावरून कदाचित् केवळ मराठी ज्ञात्यांस मूळ ग्रंथाची अल्पशी कल्पना करितां येईल. त्यांतील देवता, भूतें, तंत्र, व मंत्र इत्यादिकांविषयींचा सर्व प्रकार शुद्ध काल्पनिक आहे, त्यांत सत्याचा अंश अगदीं नाहीं, परंतु त्यांतील नैत्तिक विचार व कवित्वशक्ति अति उत्तम आहे हें सहज वाचकांच्या लक्षांत येईल.

हा ग्रंथ छात्रवर्गाच्या उपयोगाकरितां केला नाहीं, पण साधारण महाराष्ट्र जनाच्या रंजनाकरितां केला आहे. ह्यांतील सर्व प्रकार मूळ ग्रंथास अनुसरून सर्वस्वीं नसल्यास नवल नाहीं, कारण संविधान–कर्त्यानें आजारी असतां बिछान्यावर पडल्या पडल्या तें पूर्ण तयार केलें. हा ग्रंथ वाचून कदाचित् ज्यांनीं मूळ ग्रंथ वाचिला नसेल त्यांना तो वाचण्याविषयीं उत्कंठा होईल.

हें कवन प्रवर्तकाच्या अपत्यांनीं छापवून प्रसिद्ध केलें असे.

पात्रें.

रक्षक-दूत—पुढें तो मेषपालरूप धारण करितो.

कोमस—स्वमंडळीसह.

आर्या—(बहीण)

प्रथम बंधु—(पहिला भाऊ)

द्वितीय बंधु—(दुसरा भाऊ)

जलदेवता—

भूमि.

एक घोर अरण्य, ज्यांत रक्षक-दूत उतरून येतो.

कोमस-नाटक.

रक्षक-दूत.

नक्षत्र-मंडित । असें देव घर ॥
वास त्यासमोर । करितों मी ॥ १ ॥
माझ्यासंगीं दूत । बहुत रहाती ॥
भोगीत त्या शांति । आणि सुख ॥ २ ॥
जयाला मानव । जगत ह्मणती ॥
त्यांत पीडिताती । नाना नाद ॥ ३ ॥
धूलि आणि धूम्र । गगन व्यापिती ॥
मनाला त्रासिती । चिंता-घोर ॥ ४ ॥
ऐशा क्षुद्र स्थळीं । मानव राहून ॥
जाती विसरून । थोर गोष्टी ॥ ५ ॥
कदा न स्मरती । मिळे जो मुकुट ॥
साधूंसी स्वर्गात । देव-हस्तें ॥ ६ ॥
तरी कांहीं जन । करिताती यत्न ॥
कराया उड्डान । स्वर्गामाजी ॥ ७ ॥
इच्छिती ते स्वर्ण । कुंचिका घेऊन ॥
जीवन-सदन । उघडाया ॥ ८ ॥
अशांस्तव असे । केलें आगमन ॥
अन्य न कारण । याया मला ॥ ९ ॥

अन्यांच्या कार्या न । कदा मळवीन ॥
मदीय वसन । स्वर्गीय जें ॥ १०

(२)

वरुण करितो । सर्व क्षार जलीं ॥
आणि नद्यांवरी । राज्य–सत्ता ॥ ११ ॥
सागरीं द्वीपें जीं । असंख्य असती ॥
गौरवें शोभती । हिऱ्यांसम ॥ १२ ॥
त्यांवरी सुद्धां तो । करी अधिकार ॥
नेमुनी सर्दार । राज्य–कार्या ॥ १३ ॥
ऐशा एका द्वीपीं । नील-केश-जन ॥
करिती वासन । बहु वर्षें ॥ १४ ॥
तयांमाजी असे । एक शिष्ट जन ॥
ज्यासी थोर मान । लोक देती ॥ १५ ॥
करितो तो एका । शूर प्रजेवर ॥
पूर्ण अधिकार । नृपातुल्य ॥ १६ ॥
त्याचीं तीन बाळें । दूर होतीं गेलीं
एका पाठशाळीं । अध्ययना ॥ १७ ॥
आतां तीं येताती । आपुल्या गृहासी ॥
पित्राज्ञा तयांसीं । झाली तरी ॥ १८ ॥
परी त्यांचा मार्ग । राहे रानांतून ॥
असती दारुण । भयें ज्यांत ॥ १९ ॥
गाढ किर्र झाडी । निबिड अंधार ॥
श्वापदें अपार । क्रूर जीं कीं ॥ २० ॥

तीन ह्या बालांचें । कराया रक्षण ॥
जगीं आगमन । केलेंसें म्यां ॥ २१ ॥
देवेंच प्रेषिलें । असे जाण मला ॥
ऐक वार्त्ता तुला । सांगतों जी ॥ २२ ॥
वार्त्ता माझी असे । अद्भुत अपार ॥
करीना त्या सर । काव्य--कथा ॥ २३ ॥
ग्रंथीं ऐसी वार्त्ता । नसेची कथिली ॥
कदा न ऐकिली । कोणीं कर्णीं ॥ २४ ॥

(३)

मद्य—देवानें जैं । द्राक्षारस केला ॥
प्रिय जो मानिला । देवनरीं ॥ २५ ॥
भानु-कन्यें त्यांत । पदार्थ घातिला ॥
कारण नाशाला । झाला जो कीं ॥ २६ ॥
पेय तें प्राशन । करितो जो जन ॥
देहीं परिवर्त्तन । पावतो तो ॥ २७ ॥
त्याची मनुष्यता । होते पूर्ण नष्ट ॥
होतो पशुवत् । देहीं मनीं ॥ २८ ॥
मद्य--देव प्रिय । भानु-कन्ये झाला ॥
पुत्र ज्या शोभला । कोमस तो ॥ २९ ॥
पित्यातुल्य जरी । असे हा नंदन ॥
मातेच्या समान । अधिकची ॥ ३० ॥
तियेच्या संगातीं । संतत राहिला ॥
विहारी तो झाला । थोर तरी ॥ ३१ ॥

मातेपरीसही । झाला बाधाकर ॥
करी चेष्टा घोर । पांथिकांच्या ॥ ३२ ॥
सुवर्ण–पात्रांत । घालुनी स्वपान ॥
लावितो प्राशन । कराया त्यां ॥ ३३ ॥
श्रांत पांथिक ते । आनंदें तें घेती ॥
निज--तृषा-शांति । करायासी ॥ ३४ ॥
त्याचा गुण लागे । यावयासी जैसा ॥
मुकती मानुष्या । तैसे तेची ॥ ३५ ॥
मानुष्यें निश्चयें । पावतो मनुष्य ॥
देवाचें सादृश्य । स्पष्टपणें ॥ ३६ ॥
मनुष्यता त्यांची । सर्वस्वीं जाऊन ॥
होताती ते पूर्ण । पशुरूपी ॥ ३७ ॥
भल्लूक व वृक । मार्जार, सूकर ॥
व्याघ्र भयंकर ॥ होताती ते ॥ ३८ ॥
मुख मात्र त्यांचें । विकार पावतें ॥
अन्यांग राहातें । नरासम ॥ ३९ ॥
कदा न हे जन । जाणाया शकती ॥
अनिष्ट जी स्थिति । पावती ते ॥ ४० ॥
मित्राप्त सर्व ते । विसरोनी जाती ॥
लोळत राहाती । कर्दमांत ॥ ४१ ॥
अन्य अन्य स्थानीं । भ्रमण करूनी ॥
दुष्ट हा ह्या रानीं । आला असे ॥ ४२ ॥

जेव्हां साधु-जन । जाताती एथून ॥
त्याचें न जाणून । कापट्य तें ॥ ४३ ॥
येतों मी त्वरित । त्यांसी रक्षावया ॥
रूप धरूनियां । अन्य जें कीं ॥ ४४ ॥
स्वर्गीय मत्तेज । सकळ त्यजून ॥
करितों धारण । ग्राम्य रूप ॥ ४५ ॥
तदा मी दिसतों । मानव केवळ ॥
अन्य ग्राम्यांतुल्य । कोणी एक ॥ ४६ ॥
ऐसा एक जन । रानीं ह्या हिंडतो ॥
कार्य जो करितो । रक्षकाचें ॥ ४७ ॥
एथील राजानें । असे त्या ठेविलें ॥
रक्षाया आपुले । राष्ट्रीय जे ॥ ४८ ॥
सुषिर* मधुर । नित्य वाजवून ॥
करितो शमन । वायूचें तो ॥ ४९ ॥
वृक्षांचा आक्रोश । स्तब्ध तदा होतो ॥
शांति स्वीकरितो । क्षुब्ध वार्धि ॥ † ५० ॥
पहा कोणी दुष्ट । आगमन करी ॥
राहावेंची तरी । अदृश्य म्यां ॥ ५१ ॥

[मंत्रित दंड एका हातांत व दुसऱ्या हातांत पात्र असें घेऊन **कोमस** येत आहे. त्याच्या संगतीं पिशाचांचा कळप आहे. त्यांचीं मुखें अनेक पशूंचीं आहेत. पण त्यांचा खालचा भाग केवळ मानवी आहे. हातांत मशाली धरून तीं सर्व भूतें नाचत ओरडत येत आहेत.]

---

* मुरली. † खवळलेला सागर.

कोमस०—तारा जो आज्ञापी । मेषपाळां मेष ॥
गोष्ठीं रक्षायास । सायंकाळीं ॥ ५२ ॥
आतां स्वमुख तो । दावी नभावर ॥
दिसें जें सुंदर । आणि सौम्य ॥ ५३ ॥
आदित्य सुवर्ण । वहानीं बैसून ॥
करी पर्यटन । अब्धींतुनी ॥ ५४ ॥
तन्निम्न+ किरण । उपरी जाऊन ॥
करिती शोभन । पूर्व दिशा ॥ ५५ ॥
परी तो आपणां । शके न पहाया ॥
अथवा कराया । तमो-नाश ॥ ५६ ॥
आतां निजकार्या । लागूं या आपण ॥
संगातें घेऊन । मित्र-संघ ॥ ५७ ॥
घेऊं वा संगातीं । उत्साह, भोजन ॥
मद्य, नृत्य, गान । विनोदही ॥ ५८ ॥
रक्त रज्जु बांधा । तुमच्या केशांस ॥
अंजन सुवास । लावा त्यांसी ॥ ५९ ॥
विरक्ति निजाया । असे आतां गेली ॥
राहे पाठशाळीं । विज्ञान तें ॥ ६० ॥
वृद्धत्व-साधुही । विश्रांति वा घेई ॥
सूत्रें सर्व ठेवी । गुंडाळून ॥ ६१ ॥
आपण असोंची । अग्नितुल्य तप्त ॥
यौवनें प्रदीप्त । देहीं मनीं ॥ ६२ ॥

+ उतरते.

कोण तरी शके । गृहीं आतां राह्या ॥
शयनीं निजाया । मृतासम ॥ ६३ ॥
नक्षत्रें पाहा तीं । गगनीं शोभती ॥
हर्षें गान गाती । मनोहर ॥ ६४ ॥
गोलगोल तीं बा । नाचत रहाती ॥
घेउनी संगातीं । दिन-मास ॥ ६५ ॥
समुद्र व नद्या । करिती आक्रोश ॥
नची गर्जायास । लाजती तीं ॥ ६६ ॥
पिशाचादि प्राणी । शुभ्र वाळूवर ॥
खेळताती खेळ । नानाविध ॥ ६७ ॥
वन-देवता त्या । पुष्पांचे शृंगार ॥
घालुनी विहार । करिताती ॥ ६८ ॥
रात्रीचा संबंध । नाहींच निद्रेसी ॥
सुख भोगायासी । रात्रि असे ॥ ६९ ॥
शुक्र जागा असे । जागा माझा जीव ॥
पावेन गौरव । आतां मी बा ॥ ७० ॥
लागा आरंभाया । आपुलिया क्रिया ॥
असे अशा कार्या । रात्र शुद्ध ॥ ७१ ॥
दिवस स्वतेजें । दावी पापपुण्य ॥
भेद हे झांकून । टाकी तम ॥ ७२ ॥
रात्रीचा विहार । जिसी प्रिय फार ॥
असे प्रियकर । आम्हांसी ती ॥ ७३ ॥

शक्ति-देवी तीस । जन म्हणताती ॥
वास जी करिती । अंधकारीं ॥ ७४ ॥
तिची आराधना । करावी आपण ॥
पावाया प्रेरण । अशा वेळीं ॥ ७५ ॥
बैस, देवी, एथें । बैस अल्प काळ ॥
द्यावयासी बळ । तुझ्या जनां ॥ ७६ ॥
आह्मी तुझे विधि । सकळ पाळावे ॥
आणि तुला द्यावें । तुझें सर्व ॥ ७७ ॥
नको विलंब तूं । लावूं ऐकायासी ॥
प्रार्थना तुजसी । करितों जी ॥ ७८ ॥
कांकीं त्वरित गे । येई ती चावट ॥
करी सर्व उक्त । लोकांसीं जी ॥ ७९ ॥
पूर्व-स्थळीं राहे । हिंद-गिरीवर ॥
प्रातः जीस नर । ह्मणताती ॥ ८० ॥
आपुलीं गुप्त हीं । कार्यें जीं सकळ ॥
विदित करील । सूर्याला ती ॥ ८१ ॥
भास्कर ठेवील । कदा न तीं गुप्त ॥
पडूं संकटांत । आपण तैं ॥ ८२ ॥
धरा तुह्मी हात । मारा पाय खालीं ॥
नाचाया वर्तुलीं । लागा सर्व ॥ ८३ ॥

(दचकून ह्मणतो)

थांबा थांबा पहा । एथें कोणी येती ॥
पवित्र असती । अपार जे ॥ ८४ ॥

जावें तुह्मी त्वरें । वृक्षांत, नगांत ॥
राहा अंतरित । कांहीं काळ ॥ ८५ ॥
तुह्मां पाहुनी ते । निश्चयें भितील ॥
हातीं लागतील । कदापि न ॥ ॥ ८६ ॥
कोणी बा तरणी । असे तया जनीं ॥
भ्रमण अरण्यीं । करिती जी ॥ ८७ ॥
आतां मंत्रतंत्र । लागावें ह्मणाया ॥
प्राप्ति करावया । धनाची ह्या ॥ ८८ ॥
प्रथम तन्नेत्र । वश्य मी करीन
सामान्य दावून । रूप माझें ॥ ८९ ॥
जर तिच्या मनीं । संशय कीं आला ॥
प्राप्ति तिची मला । होईल न ॥ ९० ॥
सावध रहावें । तरी बा आपण ॥
अज्ञान वर्त्तन । करूं नये ॥ ९१ ॥
मित्रत्व दावुनी । विज्ञान कथुनी ॥
प्रेम तिच्या मनीं । निर्मीन मी ॥ ९२ ॥
ग्राम्य जन कोणी । मला ती मानील ॥
विश्वास ठेवील । मद्वचनीं ॥ ९३ ॥
बोलत बोलत । आहे ती बायेत ॥
करावें तें श्रुत । गुप्तपणें ॥ ९४ ॥
वृक्षांचा आश्रय । चातुर्यें करून ॥
सकळ श्रवण । करीन मी ॥ ९५ ॥

(आर्या येती)

आर्या०—एथुनी कल्लोळ । होता ऐकूं येत ॥
परी सर्व शांत । असे आतां ॥ ९६ ॥
नाहीं माझ्या कर्णीं । मला फसविलें ॥
खरेच ऐकिले । घोर स्वर ॥ ९७ ॥
तुमुल उत्सव । हास्य व विनोद ॥
मुरलीचा नाद । उत्तेजक ॥ ९८ ॥
ऐसा कोलाहाल । होतो सदा श्रुत ॥
ग्राम्य जन नृत्य । करिती जैं ॥ ९९ ॥
धान्य जैं विपुळ । क्षेत्रीं उपजतें ॥
अपार मिळतें । दधि-दुग्ध ॥ १०० ॥
तेव्हां ते दाविती । आनंद आपुला ॥
करुनियां लीला । क्षुब्ध ज्या कीं ॥ १०१ ॥
ऐशिया उद्धत । जनांच्या पासून ॥
वाटतें प्रच्छन्न । राहावें म्यां ॥ १०२ ॥
परी कोठें जावें । कळे ना मजला ॥
असे ही अबला । अज्ञानची ॥ १०३ ॥
वृक्षादि असती । विस्तीर्ण विशाळ ॥
आश्रय देतील । मजला ते ॥ १०४ ॥
परंतु त्यांतुनी । मार्ग ते कठीण ॥
अपार संकीर्ण । वृक्ष-शाखा ॥ १०५ ॥
मला मद्भ्रात्यांनीं । एथें ठेवुनियां ॥
गेले आणावया । वनफळें ॥ १०६ ॥

त्यांनीं जयीं केलें । गमन एथुनी ॥
पडली रजनी । बाहेर तैं ॥ १०७ ॥
धूसर पल्लव । मस्तकीं घेऊन ॥
सूर्याच्या मागून । चालली ती ॥ १०८ ॥
आतां त्याला काळ । झालासे बहुत ॥
नेणें मी ते गुप्त । कैसे झाले ॥ १०९ ॥
दुष्ट अंधकारें । वाटे त्यां चोरिलें ॥
आणिक ठेविलें । बंदामाजी ॥ ११० ॥
चोरस्थे रजन्ये । दुष्ट तूं चिंतीसी ॥
तरी आच्छादिसी । तारांगण ॥ १११ ॥
देवें त्यां ठेविलें । उच्च गगनांत ॥
दीपांसम नित्य । प्रकाशाया ॥ ११२ ॥
तैल असे त्यांत । घातिलें विपुळ ॥
नाहीं विझतील । कदापि ते ॥ ११३ ॥
अनाथ पांथस्था । मार्ग ते दाविती ॥
तद्भय हरिती । औदार्यानें ॥ ११४ ॥
ह्याच स्थळीं नाद । आतां म्यां ऐकिला ॥
जरी न राहिला । शेष त्याचा ॥ ११५ ॥
अंधकार मात्र । प्रसरे सर्वत्र ॥
दिसतें विचित्र । सकळ हें ॥ ११६ ॥
अगण्य विचार । माझ्या मनीं येती ॥
प्रकार दिसती । विलक्षण ॥ ११७ ॥

विषम आकृति । नेत्रां आकर्षिती ॥
कर्ण ते ऐकती । घोर स्वर ॥ ११८ ॥
मानवांचीं नामें । वाळूंत दिसती ॥
श्रवण तीं होतीं । वायु-मुखें ॥ ११९ ॥
ऐशा गोष्टी सत्य । चकित करिती ॥
परी न निर्मिती । भीति मनीं ॥ १२० ॥
सज्जन जो चाले । विवेका घेऊन ॥
कराया बोधन । आपणासी ॥ १२१ ॥
काय असे तया । पिशाचांचें भय ॥
अंधकार काय । करी त्याला ॥ १२२ ॥
शुद्ध दिव्य नेत्र । असती श्रद्धेसी ॥
असती आशेसी । शुभ्र हस्त ॥ १२३ ॥
सतित्वाचें असे । निर्दोष शरीर ॥
तत्पक्ष अपार । तेजोमय ॥ १२४ ॥
त्रि देवतांनीं ह्या । यावें मत्साह्यासी ॥
स्पष्ट मन्नेत्रांसी । दिसती ज्या ॥ १२५ ॥
ईश सत्य असे । पूर्ण सत्ताधारी ॥
रक्षी जो स्वकरीं । सर्व वस्तु ॥ १२६ ॥
शुभाशुभ दोघे । तद्दास असती ॥
नित्य जे करिती । त्याची सेवा ॥ १२७ ॥
अशुभें कदापि । करी तो शासन ॥
सद्गुण-वर्धन । करावया ॥ १२८ ॥

करी तो संकटीं । मदीय रक्षण ॥
दयेनें प्रेषून । दूत-सेना ॥ १२९ ॥
काय हें दिसलें । अचानक डोळ्यां ॥
वाटतें दिसला । प्रकाशची ॥ १३० ॥
तेजस्वी स्वपक्ष । मेघानें दावून ॥
प्रकाशित वन । केलें अल्प ॥ १३१ ॥
वाटे संबोधावें । माझ्या मी भ्रात्यांसी ॥
कारण भ्यायासी । काय असे ॥ १३२ ॥
कदा ते समीप । असती एथून ॥
ऐकतील स्वन +। करीन जो ॥ १३३ ॥
करीन असा मी । महा कलकल ॥
श्रुत कीं होईल । दूरवर ॥ १३४ ॥
माझ्या मनीं आतां । आली असे स्फूर्त्ति ॥
गेली असे भीति । सकळची ॥ १३५ ॥

(गीत गाती)

वनदेवते तूं । वायूंत राहासी ॥
अथवा भ्रमसी । नदी-तीरीं ॥ १३६ ॥
मृदु पुष्प-दरीं । करिसी शयन ॥
ऐकत गायन । बुल्बुलाचें ॥ १३७ ॥
सांग गे कोठें ते । द्विजन असती ॥
अपार शोभती । सौंदर्यें जे ॥ १३८ ॥

+ आवाज.

त्यांसी ज्या गुंफेंत । असे त्वां ठेविलें ॥
पाहिजे दाविलें । स्थळ तें गे ॥ १३९ ॥
नक्षत्र-मंडळीं । तुझा जन्म झाला ॥
तेथें गौरवाला । पावशील ॥ १४० ॥
त्यांच्या गाना तूं जैं । माधुर्य देशील ॥
नृत्य करतील । आवेशें तीं ॥ १४१ ॥
ऐसा मान सत्य । आर्ये, पावशील ॥
जर दाविशील । माझे भ्राते ॥ १४२ ॥

(कोमस पुढें येतो.)

कोमस०—केवळ मानवी । जन जो कीं असे ॥
शके गान ऐसें । कराया न ॥ १४३ ॥
सत्य ज्याच्या मनीं । वसे दैवी बल ॥
गाया तो केवळ । शके ऐसा ॥ १४४ ॥
त्याचे हर्षोद्गार । भ्रमती वायूंत ॥
मोहित करीत । सर्व वस्तु ॥ १४५ ॥
आणि मौन-पक्षीं । करुनी आसन ॥
करिती उड्डान । निशेंतुनी ॥ १४६ ॥
तेणें अंधकार । सद्गदित होतो ॥
हांसाया लागतो । कौतुकानें ॥ १४७ ॥
माझी माता गान । करिते मधुर ॥
देवांसी अपार । प्रियसे जें ॥ १४८ ॥
पण तेणें बुद्धि । मंद, शीत होते ॥
आपणा लागते । विसराया ॥ १४९ ॥

परी गायनें ह्या । होते अन्य स्थिति ॥
राहाते जागृति । बुद्धीं पूर्ण ॥ १९० ॥
आनंद भरतो । मनांत अपार ॥
प्रेरितो विचार । उन्नत जे ॥ १९१ ॥
ऐसें गान कदा । नाहीं म्या ऐकिलें ॥
पाहिजे वरिलें । तिजलागीं ॥ १९२ ॥
स्वयें जाउनियां । तिला संबोधीन ॥
स्वमुखें कथीन । मत्प्रेम मी ॥ १९३ ॥

(पुढें येतो.)

अद्भुत हे चित्रा । कोठुनी आलेंस ॥
जन्मलें नाहींस । रानीं ह्या तूं ॥ १९४ ॥
कदापि अरण्य- । देवता अससी ॥
तरी तूं भ्रमसी । ऐशा स्थळीं ॥ १९५ ॥

आर्या०–मेषपाला, व्यर्थ । असे ती रे स्तुति ॥
कर्ण न ऐकिती । कदापि जी ॥ १९६ ॥
मत्कला दावाया । गान म्या न केलें ॥
प्रिय जरी झालें । तुला तेंची ॥ १९७ ॥
गान-नाद केला । भ्रात्यां संबोधाया ॥
गेले सोडोनियां । मजला जे ॥ १९८ ॥
तरी प्रतिध्वनि । जागृत म्या केला ॥
होता तो निजला । तृणामाजी ॥ १९९ ॥

कोमस०–भ्रात्यांचा वियोग । कोण्या कार्यें झाला ॥
संकटीं पडलां । कैशा तुझी ॥ १६० ॥

आर्या०–तम असे घोर। पर्णांच्या ह्या स्थानीं ॥
दिसाया ज्यांतूनी। दुष्करसे ॥ १६१ ॥
कोमस०–ऐशा ह्या क्षुल्लक। कारणानें कैसा ॥
झाला थोर ऐसा। वियोग हा ॥ १६२ ॥
आर्या०–मृदु तृणावरीं। मला बैसवुनी ॥
गमन अरण्यीं। केलें त्यांनीं ॥ १६३ ॥
कोमस०–कापत्यानें किंवा। रागानें सोडिलें ॥
किंवा अन्य झालें। कारण त्यां ॥ १६४ ॥
आर्या०–शीत उदकाचा। निर्झर पहाया ॥
गेले ठेवुनियां। भ्राते मला ॥ १६५ ॥
कोमस०–आर्ये, एकटीच। तुजला ठेविली ॥
व्यवस्था न केली। त्वद्रक्षणा ॥ १६६ ॥
आर्या०–होते मम भ्राते। दोघे ते केवळ ॥
वाटलें लगेल। अल्प काळ ॥ १६७ ॥
कोमस०–कदाचित निशें। तयांसी गांठिलें ॥
आणि छपविलें। गुप्त स्थानीं ॥ १६८ ॥
आर्या०–माझें दुर्दैव तें। कसें पीडी मला ॥
दीना छळायाला। मुक्तसे तें ॥ १६९ ॥
कोमस०–वियोग हा आणि। सांप्रत कारण ॥
दोन्ही हीं कठिण। सोसावया ॥ १७० ॥
आर्या०–सत्य कठीणसे। सांप्रत संकट ॥
वियोग अत्यंत। पीडाकर ॥ १७१ ॥

कोमस०–होते ते कीं प्रौढ । अथवा तरुण ॥
कुसुम नूतन । जैसें असे ॥ १७२ ॥
आर्या०–त्यांचा उर्ध्व ओष्ट । होता केशहीन ॥
जणूं कीं दशन † । कुमारीचें ॥ १७३ ॥
कोमस०–सायंकाळीं जयीं । गाई गृहीं येती ॥
व गोप + बसती । भोजनासी ॥ १७४ ॥
जनां त्यां पाहिलें । द्राक्षेच्या म्यां तळीं ॥
नगाच्या जवळी । वाढली जी ॥ १७५ ॥
मृदु शाखांतुनी । होते ते काढीत ॥
द्राक्षें जीं अत्यंत । पक्व होतीं ॥ १७६ ॥
वर्त्तन तयांचें ॥ ईश्वरी दिसलें ॥
देवच भासले ॥ मजला ते ॥ १७७ ॥
ऐसे जन चापीं । इंद्राच्या राहाती ॥
विनोदें रमती । नभामाजी ॥ १७८ ॥
भयाकुळ झालों । मूर्त्ति त्या पाहून ॥
केलें त्यां वंदन । स्वेच्छापूर्व ॥ १७९ ॥
जरी तूं शोधिसी । जनांसी ऐशिया ॥
लागेन श्रमाया । आनंदें मी ॥ १८० ॥
जैसा साधु चाले ॥ स्वर्गाच्या मार्गांत ॥
तैसें ह्या रानांत ॥ शोधीन त्यां ॥ १८१ ॥
आर्या०–परी, रावा, सांग । कोण्या लघु मार्गीं ॥
त्वरें तयांलागीं । पावेन मी ॥ १८२ ॥

---

† ओंठ. + गवळी.

कोमस०–वक्र वृक्षाच्या ह्या । पश्चिम बाजूस ॥
मार्ग त्या स्थळास । जातो, आर्ये ॥ १८३ ॥

आर्या०–परी मेषपाला । अल्प ह्या प्रकाशीं ॥
अशक्य मजसी । मिळाया तो ॥ १८४ ॥
जाणे जो हें वन । लागे ह्या कार्यास ॥
अन्याचे आयास । व्यर्थ पूर्ण ॥ १८५ ॥

कोमस०–सर्व वनमार्ग । विपथ, कुपथ ॥
दऱ्या ज्या बिकट । जाणतों मी ॥ १८६ ॥
सदा मी भ्रमण । करितों या स्थानीं ॥
त्वद्भ्रात्यां शोधुनी । काढीन मी ॥ १८७ ॥
परी आतां रात्रौ । व्यर्थ सर्व यत्न ॥
पावूंच दर्शन । त्यांचें प्रातः ॥ १८८ ॥
आतां आश्रय त्वां । घ्यावा पर्णकुटीं ॥
स्थळ जें संकटीं । योग्य तरी ॥ १८९ ॥

आर्या०–मेषपाला तुझा । विश्वास धरितें ॥
सौजन्य मानितें । पूर्ण तुझें ॥ १९० ॥
सौजन्य बहुधा । गोष्ठीं दृश्य होतें ॥
विरळा मिळतें । राज गृहीं ॥ १९१ ॥
आधीं राज गृहीं । * नाम तें पावलें ॥
जरी न राहिलें । नित्य तेथें ॥ १९२ ॥

---

* इंग्रजींत सौजन्याला "कर्टसी" ह्मणतात आणि कर्टसी हा शब्द "कोर्ट" (राजवाडा) ह्या शब्दापासून झाला आहे. राजवाड्यांतील लोक शिष्टाचारांत प्रवीण असतात.

रान भयानक । असे हें अपार ॥
मनीं जें संस्कार । करी घोर ॥ १९३ ॥
परी कां म्यां भ्यावें । तुजसंगीं जाया ॥
पूर्णकुटीं घ्याया । आश्रय बा ॥ १९४ ॥
प्रभो, करीं कृपा । बुद्धि मातें द्याया ॥
संकटीं वर्त्ताया । विचारानें ॥ १९५ ॥
बरें मेषपाला । मार्गीं पुढें चाल ॥
दावायासी स्थळ । कथिसी जें ॥ १९६ ॥

(दोघे बंधु येती)

प्रथम बंधु०—मंद हे ताऱ्यांनों । मुख तुह्मी दावा ॥
तमाचा कराया । नाश अल्प ॥ १९७ ॥
अथवा हे चंद्रा । येईं तूं बाहेर ॥
टाकाया संकर । नाशुनियां ॥ १९८ ॥
अंधकार गाढ । आतां झाला असे ॥
वृक्षांत जो दिसे । दृढतर ॥ १९९ ॥
अभ्रें तुला जर । बंदांत ठेविती ॥
दावूं न तीं देती । तव प्रभा ॥ २०० ॥
तर दीप-ज्योति । दिसावी आह्मांसी ॥
शांत करायासी । निजमनें ॥ २०१ ॥
पर्णकुटींतुनी । झळको प्रकाश ॥
दावी नरवास । अरण्यीं जो ॥ २०२ ॥

द्वितीय बंधु०—जरी ऐसें सुख । दुष्कर मिळाया ॥
नेत्रां आमुचिया । स्थळांत या ॥ २०३ ॥

पडो मेष-स्वर । आमुचिया कानीं ॥
अथवा रे ध्वनि । वेणूचा तो ॥ २०४ ॥
कुक्कुट मोजितो । रजनि-प्रसर ॥
करुनियां स्वर । तूरीसम ॥ २०५ ॥
करावा तच्छब्द । आह्मी बा श्रवण ॥
मानूं समाधान । त्यांत मोठें ॥ २०६ ॥
असंख्य वृक्षांच्या । निबिड कारांत ॥*
करील हर्षित । बंदींस ह्या ॥ २०७ ॥
अहा कोठें असे । आमुची भगिनी ॥
कोण्या घोर स्थानीं । हिंडते ती ॥ २०८ ॥
वृक्षामाजी कैसें । तियेचें रक्षण ॥
वायूच्या पासोन । व्हाया शके ॥ २०९ ॥
शीत शिळीं कदा । स्वशिर ठेवून ॥
करी ती शयन । भूमीवरी ॥ २१० ॥
अथवा वृक्षासी । स्वपृष्ट टेंकून ॥
करी विलापन । भयानें ती ॥ २११ ॥
किंबहुना मुखीं । पशूंच्या पडली ॥
किंवा ती धरिली । दुष्ट जनीं ॥ २१२ ॥
प्रथम बंधु०—नको असें वदूं । अशुभ चिंतून ॥
करिसी पीडन । व्यर्थ जीवा ॥ २१३ ॥
जरी ती संकटीं । असली पडली ॥
विफल आपुली । चिंता सर्व ॥ २१४ ॥

---

* बंदी खान्यांत.

परी यद्यपि ती । निर्भय असली ॥
आपण रक्षिली । व्यर्थ भीति ॥ २१५ ॥
माझ्या भगिनीचें । नसे मला भय ॥
थोरसे प्रभाव । तन्नीतीचा ॥ २१६ ॥
तिची निर्भयता । अक्षय राहील ॥
नष्ट न होईल । अंधकारें ॥ २१७ ॥
आपुलिया तेजें । शके नीति पाह्या ॥
इच्छी करावया । जें जें कार्य ॥ २१८ ॥
जरी सूर्य चंद्र । सागरीं बुडाले ॥
प्रकाशें आपुले । पाहील ती ॥ २१९ ॥
अरण्य बा नसे । नाशकारी स्थळ ॥
राहे तेज–बळ । जरी मनीं ॥ २२० ॥
ज्ञान-देवी स्वतः । शोधी शांत स्थान ॥
करावया ध्यान । मुक्तपणें ॥ २२१ ॥
ज्याच्या शुद्ध उरीं । असेची प्रकाश ॥
होय त्या दिवस । आत्म तेजें ॥ २२२ ॥
परी ज्याचा जीव । असे तमो-मय ॥
कुविचारां ठाय । मिळे ज्यांत ॥ २२३ ॥
अंधारीं तो चाले । मध्य-दिन जरी ॥
स्वजीवाच्या चारीं* । राहे तोची ॥ २२४ ॥

द्वितीय बंधु०--ध्यान करावया । निर्जन जें स्थान ॥
देई उत्तेजन । खरोखरी ॥ २२५ ॥

---

* बंदिखान्यांत

ऐशा स्थळीं योग्या । पशु किंवा नर ॥
होती पीडाकर । कदापि न ॥ २२६ ॥
राज-गृह जैसें । अभयच्च असे ॥
वन असे तैसें । योग्यालागीं ॥ २२७ ॥
कोणी न इच्छिती । त्याची माळा ध्याया ॥
पात्र व पोथिया । चोरावया ॥ २२८ ॥
त्याच्या शुभ्र केशां । स्पर्श न करिती ॥
सुखी त्या ठेविती । सर्व जन ॥ २२९ ॥
परी ऐशी वार्त्ता । सौंदर्याची नसे ॥
हेम–वृक्ष असे । तेंची, भ्रात्या ॥ २३० ॥
सुंदर तो वृक्ष । दिसे बा नेत्रांसी ॥
दिव्य फलें ज्यासी । येती बहु ॥ २३१ ॥
त्याच्या रक्षणासी । लागे सर्प घोर ॥
ठेवायासी दूर । लांपट्यांसी ॥ २३२ ॥
कृपणाचें धन । जर कीं ठेविलें ॥
चौरें जेथें केलें । निज गृह ॥ २३३ ॥
कैसें धन तेंची । अक्षय राहील ॥
कैसें न लुटील । तस्कर तें ॥ २३४ ॥
कैसें तर भय । नसे ह्या अरण्यीं ॥
एकटी तरुणी । जेथें असे ॥ २३५ ॥
अंधारा, एकांता । भीत नाहीं जरी ॥
मानितों साचारी । संकटासी ॥ २३६ ॥

अंधारीं एकांतीं । संकटें असती ॥
अपार पीडिती । अबलां जीं ॥ २३७ ॥
आपुली भगिनी । एकटी पाहुनी ॥
स्पर्श तीस कोणी । करतील ॥ २३८ ॥

प्रथम बंधु०–मला नसे भय । ऐसें माझ्या प्रिया ॥
यद्यपि संशया । स्थळ दिसे ॥ २३९ ॥
जेथें भय आशा । समान असती ॥
मद्बुद्धि मानिती । आशा थोर ॥ २४० ॥
आपुली भगिनी । दुर्बल रे नसे ॥
तुजलागीं जैसें । वाटतें बा ॥ २४१ ॥
तिच्याठायीं आहे । गुप्त महाबळ ॥
ज्याचा तूं विचार । करीं मनीं ॥ २४२ ॥

द्वितीय बंधु०–कवणें असे तें । महा गुप्त बळ ॥
जाणें मी केवळ । ईश–बळ ॥ २४३ ॥

प्रथम बंधु०–तेंही एक असे । तरी असे अन्य ॥
देवाचेंच दान । तेंही जाण ॥ २४४ ॥
आपुलिया मनीं । ज्या काळीं तें येतें ॥
आपुलेंच होतें । सर्वस्वीं तें ॥ २४५ ॥
सतीत्व तयासी । जन बा ह्मणती ॥
थोर ज्याची कृति । असे जाण ॥ २४६ ॥
जया स्त्री-मनीं तें । करितें वर्त्तन ॥
करिते धारण । कवच ती ॥ २४७ ॥

ऐसी बाला जरी । अरण्यीं भ्रमली ॥
पर्वतीं निजली । नदी-तीरीं ॥ २४८ ॥
वन्य जन, चौर । कदा न शकती ॥
मळवाया कांति । तियेची बा ॥ २४९ ॥
अघोर पिशाच । जेथें फिरताती ॥
आणि करिताती । नाना चेष्टा ॥ २५० ॥
तेथेंही आर्या ती । निर्भय राहील ॥
प्रभाव दावील । सतीत्वाचा ॥ २५१ ॥
मात्र गर्व तिनें । कदा न करावा ॥
सर्वस्वीं सोडावा । अभिमान ॥ २५२ ॥
बहु ज्ञानी जन । गौरवें कथिती ॥
नसे कांहीं भीति । सतींलागीं ॥ २५३ ॥
तंत्र, मंत्र, जादू । कदा न शकती ॥
करावया क्षति । बाधक ज्या ॥ २५४ ॥
असंख्य असती । ग्रंथांतरीं कथा ॥
प्रमाण सर्वथा । देताती ज्या ॥ २५५ ॥
डायन्ना देवीनें । सिंहां केलें लीन ॥
सतीत्व रक्षून । निश्चयानें ॥ २५६ ॥
पवित्र **मिनर्व्हा** । सप्रभाव झाली ॥
स्वपदीं ठेविली । पशु-सेना ॥ २५७ ॥
देवा प्रिय असे । सतीत्व अपार ॥
धाडी दूतवर । रक्षाया तें ॥ २५८ ॥

सतीच्यापासून । पापिष्ट विचार ॥
ठेविती ते दूर । पुण्य-बळें ॥ २५९ ॥
पुण्यालंकारें ती । शोभाया लागती ॥
देव-रूपी होती । अंतीं पूर्ण ॥ २६० ॥
परी दुष्ट नेत्रें । पाहे जयीं कोणी ॥
बोले स्ववचनीं । अपूत जें ॥ २६१ ॥
किंवा दुष्ट कृति । देहानें करून ॥
शरीर व मन । भ्रष्टवितो ॥ २६२ ॥
त्याचा जीव होतो । मलिन व घन ॥
पशुवत पूर्ण । नृत्वहीन ॥ २६३ ॥
ऐसे भ्रष्ट जन । श्मशान-भूमींत ॥
राहाती पूजीत । मृत देहा ॥ २६४ ॥
देह केवळ ते । सुप्रिय मानिती ॥
समीप राहाती । त्यांच्या सदा ॥ २६५ ॥
मेल्यावरी सुद्धां । त्यांपाशीं बैसती ॥
कदापि इच्छिती । सोडाया न ॥ २६६ ॥

द्वितीय बंधु०—ईश्वरी विज्ञान । किती तें मधुर ॥
विषम, कठोर । कदापि न ॥ २६७ ॥
असे तें सुस्वर । विण्याच्या समान ॥
अमृत-भोजन । अक्षय जें ॥ २६८ ॥
अति तृप्त न तें । कदाकाळीं करी ॥
चेतवी अंतरीं । निजप्रीति ॥ २६९ ॥

जड मूर्ख तया । केवळ दूषिती ॥
तन्मूल्य नेणती । ते बा तरी ॥ २७०॥
प्रथम बंधु॰–पाहा ऐकूं येतें । उत्ताल× गर्जन ॥
परी तें दुरून । होतें श्रुत ॥ २७१ ॥
द्वितीय बंधु॰–माझ्या कानीं सुद्धां । शब्द तो पडला ॥
असावा कसला । कोण जाणे ॥ २७२ ॥
प्रथम बंधु॰–आपुल्या सारिखा । पद–भ्रष्ट जन ॥
करीत भ्रमण । असावा तो ॥ २७३ ॥
रजनीनें तया । कदापि गांठिलें ॥
वृक्षांनीं ठेविलें । शाखा-जालीं ॥ २७४ ॥
अथवा असेल । आभीर, काष्टिक ॥
किंवा बा नायक । चौरांचा जो ॥ २७५ ॥
द्वितीय बंधु॰–देव रक्षो माझी । प्रिय ती भगिनी ॥
दूतांसी प्रेषुनी । तिच्या साह्या ॥ २७६ ॥
समीप येताहे । उत्ताल ती वाणी ॥
पाहूं स्वनयनीं । जनची तो ॥ २७७ ॥
करावीं धारण । शस्त्रें तीं आपुलीं ॥
पाहिजे ठेविली । स्वसिद्धता ॥ २७८ ॥
प्रथम बंधु॰–कदापि असेल । मित्र तो आपुला ॥
भय धरायाला । कारण न ॥ २७९ ॥
असलाच शत्रु । युद्धासी कारण ॥
योग्य असे जाण । माझ्या भ्रात्या ॥ २८० ॥

× जोराचें, मोठें.

शुभ कार्यी साह्य । करितो ईश्वर ॥
करो आह्मांवर । कृपा तोची ॥ २८१ ॥

(मेषपालरूप धारण करून रक्षक–दूत येतो)

शब्द हा श्रवण । वाटे केला असे ॥
कोण करी ऐसें । आगमन ॥ २८२ ॥
नजीक फार तूं । येऊं नको, जना ॥
मुकशील प्राणा । निश्चयें तूं ॥ २८३ ॥

र० दूत०–कोण तें बोलतें । रावच असती ॥
रावजीची उक्ति । पडे कर्णी ॥ २८४ ॥

द्वि० बं०–असे आपुला हा । शूर मेषपाल ॥
साहाय्य करील । आपुलें तो ॥ २८५ ॥

प्र० बं०–काय असे हा तो । नद्यानद जया ॥
धांवती प्रेक्षाया । अत्यानंदें ॥ २८६ ॥
तुझ्या गानें पुष्पें । गौरवें फुलती ॥
आणि प्रसरती । मिष्ट गंध ॥ २८७ ॥
कैसा एथें तूं रे । याया शकलास ॥
शोधाया आलास । मेषां काय ॥ २८८ ॥
परी अशा रात्रीं । शके न दिसाया ॥
अंधकार जया । आच्छादितें ॥ २८९ ॥

र० दत–ऐशा क्षुद्र कार्या । आलों नाहीं, रावा ॥
नाहींच पाहाया । आलों मेषां ॥ २९० ॥
माझें कार्य असे । यापरीस थोर ॥
करी न त्या सर । मेष–धन ॥ २९१ ॥

सांग कोठें असे। पूज्य ती बा आर्या ॥
माझे नेत्र जया। पाहाती न ॥ २९२ ॥
प्र० बं०–आमुची भगिनी। झालीसे हरण ॥
रानीं पर्यटन। करितांना ॥ २९३ ॥
परी दोष त्याचा। नसे आह्मांवरी ॥
तदुपेक्षा केली। नाहीं कोणीं ॥ २९४ ॥
र० दूत०–अहा सत्य झालें। तर माझें भय ॥
पाहिजे उपाय। केला त्वरें ॥ २९५ ॥
प्र० बं०–भय काय असे। सांग, मित्रा, मला ॥
असें ऐकायाला। अधिर मी ॥ २९६ ॥
र० दूत०–काव्य–कादंबऱ्या। मिथ्या न सकळ ॥
सत्य कदाकाळ। कथिती त्या ॥ २९७ ॥
जगीं कदा कदा। स्थळें असताती ॥
जयांत राहाती। पिशाचादि ॥ २९८ ॥
ऐसें एक स्थान। असे हें अरण्य ॥
करिती वासन। ज्यांत भूतें ॥ २९९ ॥
त्यामाजी एकसे। मायीं जें प्रवीण ॥
मानव–नाशन। करी जेणें ॥ ३०० ॥
नर–रूप तेंची। करितें धारण ॥
मानिती तें जन। मानव त्या ॥ ३०१ ॥
मंत्रित पेय तें। देतें प्राशायासी ॥
तृषित पांथांसी। अरण्यीं ह्या ॥ ३०२ ॥

तत्काळ पथिक । पशु–रूप होती ॥
उत्ताल गर्जती । पशुतुल्य ॥ ३०३ ॥
पांथ-नाशा ते तैं । सतत भ्रमती ॥
प्रयोग करिती । नानाविध ॥ ३०४ ॥
सायंकाळीं आज । मेष जैं बसले ॥
भक्षुनी आपुलें । तृण-खाद्य ॥ ३०५ ॥
बांधांवरी तदा । करूनी आसन ॥
केलें देव–ध्यान । नित्याचें म्यां ॥ ३०६ ॥
अकस्मात तदा । आक्रोश थांबला ॥
भूतांनीं जो केला । अरण्यांत ॥ ३०७ ॥
नंतर गंभीर । वाणी श्रुत झाली ॥
मला जी भासली । गंधा जेवी ॥ ३०८ ॥
वायूंत सुस्वर । सकळ भरला ॥
अनालाप झाला । सद्गदित ॥ ३०९ ॥
तयाला वाटलें । स्ववृत्ति सोडोन ॥
करावी श्रवण । वाणी ती बा ॥ ३१० ॥
मी ही ती लागलों । आस्थेनें ऐकाया ॥
जीवित्र जी द्याया । शके मृतां ॥ ३११ ॥
परी तत्काळ म्यां । जाणिलें हें रत्न ॥
सोदर्या†–भूषण । तुमचें तें ॥ ३१२ ॥
चकित मी झालों । दुःखाब्धीं बुडालों ॥
धांवत सुटलों । पाह्या तिला ॥ ३१३ ॥

---

† वहीण.

जेथें गान-नाद । होता म्यां ऐकिला ॥
जाउनी त्या स्थळा । पावलों मी ॥ ३१४ ॥
तेथें मायाकरें । रूप बदलून ॥
होतें आगमन । केलें आधीं ॥ ३१५ ॥
ग्राम्य जन त्यासी । तियेनें मानून ॥
भ्रातृ-वर्त्तमान । विचारिलें ॥ ३१६ ॥
तदा म्यां जाणिलें । शोधी ती तुझांसी ॥
आलों पाहायासी । तरी तुझां ॥ ३१७ ॥
द्वि० बं०—वृक्ष व रजनि । नर्कासी मिळून ॥
दीन-नाशा यत्न । करिताती ॥ ३१८ ॥
एकटीच तिला । तयांनीं पाहून ॥
असे तन्नाशन । आरंभिलें ॥ ३१९ ॥
काय बंधुराया । ऐसाच त्वां दिला ॥
मदीय जीवाला । आधार बा ॥ ३२० ॥
प्र० बं०—हाच सत्य दिला । आधार मीं तुला ॥
धरुनियां त्याला । राहाच तूं ॥ ३२१ ॥
वदलों तें न मी । कदा निषेधीन ॥
कथीत राहीन । तेंची सदा ॥ ३२२ ॥
दैव, मंत्र, तंत्र । दुर्बळ सकळ ॥
रक्षिती न बळ । पुण्य--नाशा ३२३ ॥
पुण्य पुरुषां तीं । बहु पीडितील ॥
पण करितील । नची भ्रष्ट ॥ ३२४ ॥

पुण्य पुरुष हे । पातका भितील ॥
पण न होतील । वश्य त्यासी ॥ ३२५ ॥
योजिलें जें नाशा । त्यां न तें नाशील ॥
परी गौरवील । अपार त्यां ॥ ३२६ ॥
अनळ सुवर्णा । करी शुद्ध पूर्ण ॥
साधु कीर्त्तिमान । छळें होती ॥ ३२७ ॥
त्यांचें पुण्य सत्व । दृढत्व पावून ॥
करितें शोभन । त्यांजलागीं ॥ ३२८ ॥
परी दुष्टपण । दुष्टासी मारील ॥
नीच त्या करील । सर्वपरी ॥ ३२९ ॥
जर नसे सत्य । कथीं मी जें तुला ॥
मान आकाशाला । अस्थिर तूं ॥ ३३० ॥
तृणावरी तर । पृथ्वीसे स्थापिली ॥
लटकी सगळी । सृष्टि-कथा ॥ ३३१ ॥
चलावें एथूनी । आतां बा आपण ॥
काढावें शोधून । तया दुष्टा ॥ ३३२ ॥
करूंच स्वसेसी * । मुक्त त्यापासूनी ॥
युद्धही करूनी । साधूं मुक्ति ॥ ३३३ ॥
जरी त्याची सेना । आली त्याच्या साह्या ॥
लावूं पळावया । सकळ ती ॥ ३३४ ॥
करितो हा दुष्ट । व्यर्थ अभिमान ॥
अज्ञान राहून । वनामाजी ॥ ३३५ ॥

* बहिणीसी

धरूनी तत्केश । नम्र त्या करीन ॥
द्यावया लावीन । सौदर्यैतें ॥ ३३६ ॥
नाहीं तर सत्य । प्राणा तो मुकेल ॥
कदा न उठेल । मृत्यूंतुनी ॥ ३३७ ॥

र० दूत०—अहा माझ्या रावा । उत्तम वदसी ॥
धैर्यरे दाविसी । विस्मापक ॥ ३३८ ॥
परी तुझा खड्ग । व्यर्थ ह्या कार्यासी ॥
अन्य शस्त्रें ह्यासी । लागताती ॥ ३३९ ॥
भूत-चेष्टा- नाशा । लागे बा साधन ॥
नसे ज्याचें ज्ञान । मानवांसी ॥ ३४० ॥
भूत—चेष्टीं बल । असतें अपार ॥
शकती न नर । नाशाया जें ॥ ३४१ ॥
दुष्ट हा शकेल । स्वदंडें केवळ ॥
कराया विफल । तुझे यत्न ॥ ३४२ ॥

प्र० बंधु०—काय मेषपाला । कैसा न तूं भिसी ॥
मला कथायासी । कुवार्त्ता ही ॥ ३४३ ॥

रक्षक दू०—आर्येच्या मुक्तीच्या । होतों जैं विचारीं ॥
स्मरणीं तैं आली । एक वस्तु ॥ ३४४ ॥
एक ग्राम्य जन । राहे ह्या अरण्यीं ॥
वनस्पति--गुणीं । प्रवीण जो ॥ ३४५ ॥
आपुलें हें ज्ञान । योजितो तो जन ॥
करावया शून्य । भूत—चेष्टा ॥ ३४६ ॥

मजवरी लोभ । बहु तो करितो ॥
गायासी कथितो । मजलागीं ॥ ३४७ ॥
मृदु तृणावरी । आनंदें बैसून ॥
करितो श्रवण । गान माझें ॥ ३४८ ॥
मग चर्म–पुटी । आस्थें उघडून ॥
दावितो नवीन । पदार्थ तो ॥ ३४९ ॥
त्यांचीं नामें, गुण । चातुर्यें वर्णितो ॥
जेणें बहु होतों । विस्मित मी ॥ ३५० ॥
एके दिनीं त्यानें । दावियेलें मूळ ॥
दिसलें समल । विरूप जें ॥ ३५१ ॥
परी गुणकारी । होतें तें अपार ॥
करी चमत्कार । जन-हिता ॥ ३५२ ॥
तंत्र–मंत्र-नाश । शके तें कराया ॥
भूतं भिती जया । अपारची ॥ ३५३ ॥
कृष्ण- वर्ण. पत्रें । तयासी येताती ॥
कंटक वरती । शोभती ही ॥ ३५४ ॥
अन्य देशीं त्यासी । येती स्वर्ण-फुलें ॥
ऐसेंही कथिलें । ग्राम्यानें त्या ॥ ३५५ ॥
वाढतें तें वनीं । तरी वन्य–जन ॥
जाणती न गुण । मुळाचे त्या ॥ ३५६ ॥
त्यावरी चालती । पायीं तुडविती ॥
अज्ञान रक्षिती । त्याचें पूर्ण ॥ ३५७ ॥

परी मी तें पुटीं । माझ्या बा ठेविलें ॥
वाटलें मिळालें । मोठें धन ॥ ३९८ ॥
आतांच योजिलें । म्यां तें माझ्या कार्या ॥
ज्ञान पावावया । मायाव्याचें ॥ ३९९ ॥
त्याच्या वेषांतून । त्याला म्यां जाणिलें ॥
सकळ प्रेक्षिलें । त्याचें कार्य ॥ ३६० ॥
देईन तुला मी । अद्भुत हें मूळ ॥
तरी शकशील । गांठाया त्या ॥ ३६१ ॥
धैर्यें तूं प्रवेश । करी तन्मंदिरीं ॥
करीं तयावरी । खड्गापात ॥ ३६२ ॥
त्याच्या हातांतूनी । पाड त्याचें पात्र ॥
पूर्ण चूर्ण कर । तयाचें तूं ॥ ३६३ ॥
त्यांतील रस तैं । भूवरी पडेल ॥
पीडाया शकेल । न पुनः तो ॥ ३६४ ॥
भूत-दंड सुद्धां । घेई त्वत्स्वाधीन ॥
नाश तदा पूर्ण । पावेल तो ॥ ३६५ ॥
प्रथम बंधु०–मित्रा, चाल पुढें । येतों मी मागून ॥
आपुलें रक्षण । करो देव ॥ ३६६ ॥

(ज्यांत सर्व प्रकारचे उत्तम पदार्थ ठेविले आहेत असें एक मंदिर दृष्टीस पडतें. तेथें मेजावर खाद्यें मांडिलीं आहेत. मधुर गाण्याचे स्वर कानीं पडताहेत. आर्येला मंत्रित खुर्चीवर बसविलें आहे, आणि **कोमस** आपली दुष्ट मंडळी

संगातीं घेऊन तिच्याजवळ येतो. तीस आपलें पात्र घ्याव-यास सांगतो, पण ती नाकारिते, आणि उठायास लागते.

कोमस०—नको यत्न करूं । आर्यें, तूं उठाया ॥
होईल त्वत्काया । शिलारूपी ॥ ३६७ ॥
दंड हा गे लागे । अल्प हालवाया ॥
प्रताप दावाया । त्याचा तुला ॥ ३६८ ॥

आर्या०—मूर्खा, गर्व व्यर्थ । कासया करिसी ॥
कासया दाविसी । बालिशता ॥ ३६९ ॥
जरी असे तुवां । मद्देह खिळिला ॥
स्पर्शाया मनाला । शकसी न ॥ ३७० ॥
देवेंच इच्छिलें । मद्देह—पीडन ॥
कृपेनें चिंतून । माझें हित ॥ ३७१ ॥

कोमस०—क्रोध कां दाविसी । कटु कां वदसी ॥
कासया वर्त्तसी । विपरित ॥ ३७२ ॥
गृहासी ह्या शोभे । अन्यची वर्त्तन ॥
देई उत्तेजन । जीवाला जें ॥ ३७३ ॥
एथुनियां दुःख । करी पलायन ॥
करितें वासन । सुख मात्र ॥ ३७४ ॥
तारुण्या शोभती । तरुण इच्छिती ॥
ऐसींच असती । सौख्यें एथें ॥ ३७५ ॥
पहा रस कैसा । पात्रीं ह्या नाचतो ॥
उज्ज्वल दिसतो । ज्वालेतुल्य ॥ ३७६ ॥

जीवा शांति देतो । बुद्धींतें प्रकाश ॥
प्रसरी सुवास । उत्तेजक ॥ ३७७ ॥
कां न करिसी तूं । ह्याचें अल्प पान ॥
व्हाया त्याचें ज्ञान । तुझ्या सुखा ॥ ३७८ ॥
निष्ठुर कां होसी । तुझ्या तूं देहासी ॥
सुख पावायासी । दिलासे जो ॥ ३७९ ॥
नाणें हें रक्षिसी । व्यय करावया ॥
नाहींच ठेवाया । भूमीमाजी ॥ ३८० ॥
ईश्वर–संकेत । पूर्ण उपेक्षिसी ॥
विफल करिसी । धन हेंची ॥ ३८१ ॥
श्रांत जना असे । अवश्य विश्रांति ॥
सुख आणि शांति । दुःखितांसी ॥ ३८२ ॥
निरन्न व श्रांत । आज भ्रमलीस ॥
विश्राम अवश्य । तुला तरी ॥ ३८३ ॥
सकळ सुखें हीं । पात्रीं ह्या राहाती ॥
तुज तीं लागती । स्वीकाराया ॥ ३८४ ॥
आर्या०–दुष्टा, तुझ्या पात्रीं । कदा न मिळती ॥
वस्तु ज्या इच्छिती । साधु जन ॥ ३८५ ॥
सत्य व सारल्य । पात्रीं ह्या नसती ॥
प्रवीण कापट्यीं । असती तूं ॥ ३८६ ॥
पर्ण-कुटी मातें । तुवां जी कथिली ॥
हीच तूं वर्णिली । सांग सत्य ॥ ३८७ ॥

कुरूप राक्षस । कोण हे असती ॥
काय बा करिती । एथें तेची ॥ ३८८ ॥
देवा, करीं माझें । कृपें तूं रक्षण ॥
त्वदीय शरण । प्रार्थितें मी ॥ ३८९ ॥
चल जा निघोन । भूता, तूं एथून ॥
व्यर्थ तुझे यत्न । होतीलची ॥ ३९० ॥
यद्यपि असलें । देवाचें हें पान ॥
कदा न घेईन । त्वद्धस्तें तें ॥ ३९१ ॥
केवळ सज्जन । देती शुभ दान ॥
ज्ञान्यां नसे मान्य । अशुभ जें ॥ ३९२ ॥
अति कटु लागे । त्यांच्या तें जिव्हेला ॥
कारण नाशाला । सबल जें ॥ ३९३ ॥
कोमस०–किती गाढ मूर्ख । मानव असती ॥
सत्य ते मानिती । असत्य जें ॥ ३९४ ॥
कैसा निराहार । होय हितकर ॥
कृश व पांडुर । असेची जो ॥ ३९५ ॥
कासया असती । पदार्थ जगतीं ॥
जनां जे शकती । हर्षावया ॥ ३९६ ॥
सर्वत्रची कां ते । ठेविले असती ॥
अनायासें प्राप्ति । होते ज्यांची ॥ ३९७ ॥
उत्तम सुगंध । मिष्ट पुष्प फळें ॥
पशु व पाखरें । नानाविध ॥ ३९८ ॥
अब्ध्युदरीं मत्स्य । विपुल राहाती ॥
रुच्य ने मानिती । रावराजे ॥ ३९९ ॥

*हरित †विपर्णीं । असंखेय कीट ॥
वसती कांतीत । मृदु †कौशां ॥ ४०० ॥
वसनें तयांचीं । मानव करिती ॥
अमूल्य मानिती । नृपति जीं ॥ ४०१ ॥
बाह्यतः जगत । भरलेंसे जैसें ॥
अंतरीं तें तैसें । असेची पैं ॥ ४०२ ॥
त्याच्या उदरांत । असती विपुळ ॥
हीरक उज्ज्वल । आणि स्वर्ण ॥ ४०३ ॥
अलंकार त्यांचे । अत्युत्तम होती ॥
धारण करिती । कौमारी ज्या ॥ ४०४ ॥
विरक्ति मानवां । आवश्यक जर ॥
वस्तु ह्या कां तर । देवें केल्या ॥ ४०५ ॥
भक्षितील जन । साधारण अन्न ॥
मात्र जल–पान । करतील ॥ ४०६ ॥
वसनें जीं स्थूल । प्रिय तीं मानून ॥
सदा तीं धारण । करितील ॥ ४०७ ॥
कासया उत्कृष्ट । दानें देवें दिलीं ॥
कासया तीं केलीं । मनोहर ॥ ४०८ ॥
अपमान जन । देवाचा करिती ॥
दानें उपेक्षिती । त्याचीं जैं ते ॥ ४०९ ॥
ईर्षा रक्षी देव । कदा न स्वमनीं ॥
ठेवी न रक्षुनी । निजधन ॥ ४१० ॥

---

* हिरव्या + दुकानी † रेशीम.

अथवा मानव । नसती कानीन* ॥
असती नंदन । देवाचे ते ॥ ४११ ॥
जगावरी त्यांचा । असे अधिकार ॥
शकती त्यांतील । वस्तु ध्याया ॥ ४१२ ॥
अनुभव त्यांचा । जर न घेतील ॥
नाश करतील । जगाचा ते ॥ ४१३ ॥
जगत्कुक्षीं भार । विशाळ होईल ॥
विनाश पावेल । निश्चयें तें ॥ ४१४ ॥
पशु सर्व ठायीं । गाढ भरतील ॥
पक्षी झांकितील । गगनासी ॥ ४१५ ॥
मत्स्य सागरांत । मृत्यु पावतील ॥
हीरक येतील । बाहेर ते ॥ ४१६ ॥
जलधीच्या उरीं । तेजें झळकून ॥
नक्षत्रां समान । दिसतील ॥ ४१७ ॥
मत्स्य त्यांसी सदा । स्वनेत्रीं पाहून ॥
देतील सोडोन । सर्व लज्जा ॥ ४१८ ॥
बाहेर येतील । सूर्यासी प्रेक्षाया ॥
भिती आतां जया । अपार ते ॥ ४१९ ॥
माझी वार्त्ता ऐक । आर्ये, तूं सकळ ॥
नाशिसी विफल । कौमार्य कां ॥ ४२० ॥
सौंदर्य असें गे । सृष्टीचेनि नाण ॥
योग्य प्रसरण । करावया ॥ ४२१ ॥
रक्षुनी कदापि । नंची तें ठेवावें ॥
उपयोगा द्यावें । इतरांचे ॥ ४२२ ॥

---

* दासीपुत्र

आपुल्याच कार्यीं । सदा न योजावें ॥
औदार्यें लावावें । जन-सुखा ॥ ४२३ ॥
गर्वें तुझी वेला । जर हारिशील ॥
क्षय तें पावेल । पुष्पासम ॥ ४२४ ॥
आपुल्याच कांडीं । शिर लववुनी ॥
जाईल सुकुनी । पूर्णपणें ॥ ४२५ ॥
मानिती सौंदर्या । सृष्टीचें भूषण ॥
ज्याचें प्रदर्शन । आवश्यक ॥ ४२६ ॥
दावावें तयासी । राजांच्या मंदिरीं ॥
उत्सवीं व यात्रीं । सर्वत्रची ॥ ४२७ ॥
सर्वांच्या दृष्टीस । पाडावा हा मणी ॥
निर्मावया मनीं । चमत्कार ॥ ४२८ ॥
सामान्य अबला । गृहांत रहाती ॥
ग्राम्य+ त्या पावती । नाम तरी ॥ ४२९ ॥
स्थूल त्यांचा वर्ण । रूक्ष त्यांचा गल्ल ॥
घालविती काळ । दास्य-कृत्यीं ॥ ४३० ॥
सूत्र त्या कांतिती । अन्न शिजविती ॥
शुश्रूषा करिती । स्वबालांची ॥ ४३१ ॥
कासया कार्या ह्या । ओष्ट जे आरक्त ॥
चक्षु प्रेमयुक्त । काळे केश ॥ ४३२ ॥
अन्य हेतु ह्यांचा । असे सत्य जाण ॥
करी तूं मनन । वार्त्तेचें ह्या ॥ ४३३ ॥

+ गांवढळ, कुरूप; इंग्रजींत त्यांस " होमलि " ह्मणतात-ह्मणजे केवळ घरांत राहणाऱ्या, चार लोकांत बाहेर न पडणाऱ्या.

अन्यथा त्वदीय । यौवन जाईल ॥
शोक करशील । व्यर्थ तदा ॥ ४३४ ॥

आर्या० इच्छिलें न आधीं । अशा ह्या मी स्थानीं ॥
मुख उघडुनी । बोलावया ॥ ४३५ ॥
परी स्वरक्षणा । मयेच्यापासून ॥
निश्चय–भंजन । अवश्यसे ॥ ४३६ ॥
पाही हा चांडाळ । मोहाया मन्मन ॥
मोहिले नयन । माझे जैसे ॥ ४३७ ॥
असत्या सत्याचें । स्वरूप देऊन ॥
करितो हा यत्न । माझ्या नाशा ॥ ४३८ ॥
धर्म स्वभावतः । धरी पूर्ण मौन ॥
निज–प्रदर्शन । उपेक्षुनी ॥ ४३९ ॥
परी पाप करी । गर्वें प्रकाशन ॥
वक्तृत्व करून । अतिरिक्त ॥ ४४० ॥
ऐसी वाचालता । दावी तें धराया ॥
झालीं आपुलिया । दीन जनां ॥ ४४१ ॥
माझ्या मनीं तरी । वंचकाची उक्ति ॥
क्रोध चेतविती । अपारची ॥ ४४२ ॥
नको, दुष्टा, दोषूं । सृष्टीची रचना ॥
केली न ती जना । नाशावया ॥ ४४३ ॥
तियेचें सौंदर्य । नसे निर्मावया ॥
मनीं नरांचिया । कुकामना ॥ ४४४ ॥
रक्षी ती वैपुल्य । साधूच्या कार्यासी ॥
ठेवी स्वजीवासी । स्वाधीन जो ॥ ४४५ ॥

जर नर जगीं । न्यायानें वर्त्तते ॥
साधु न भोगिते । कदा दैन्य ॥ ४४६ ॥
आपुला योग्य जो । भाग ते पावते ॥
शंकेसी राहातें । कारण न ॥ ४४७ ॥
सृष्टि-दानें सर्वां । यथार्थ मिळती ॥
सकळांची तृप्ति । होती त्यांनीं ॥ ४४८ ॥
सृष्टीच्या तीं कुक्षीं । व्यर्थ न राहाती ॥
कदा न करिती । पीडा तिला ॥ ४४९ ॥
दात्याची तीं दया । अपार दाविती ॥
जगीं जेणें होती । त्याची स्तुति ॥ ४५० ॥
मित उपभोग । नची जे करिती ॥
देवा ते निंदिती । अत्याचारें ॥ ४५१ ॥
सौकर भक्षक । सत्य ते असती ॥
देवा विसरती । पूर्णपरी ॥ ४५२ ॥
इच्छिती ते मात्र । उदर भराया ॥
तुष्ट करावया । कुवासना ॥ ४५३ ॥
पशुतुल्य ऐसे । जन हे असती ॥
योग्य ते नसती । नर-नामा ॥ ४५४ ॥
अधिक बोलाया । शकें मी, रे भूता ॥
जर तुझ्या हिता । आवश्यक ॥ ४५५ ॥
सतीत्वा-विरुद्ध । धजे जो बकाया ॥
लज्जा सोडोनियां । सर्वपरी ॥ ४५६ ॥
तयासी अधिक । विज्ञान कथून ॥
त्याचें संशोधन । अशक्यसे ॥ ४५७ ॥

नसती त्याजला । कर्ण ऐकावया ॥
बुद्धि जाणावया । गुह्य तें बा ॥ ४५८ ॥
सतीत्व-विज्ञान । असे महा थोर ॥
अत्यंत दुष्कर । वर्णायासी ॥ ४५९ ॥
पावायासी तेंची । पात्र तूं नससी ॥
शोभते तुजसी । तुझी स्थिति ॥ ४६० ॥
तुझें चातुर्य तें । ठेवीं तूं रक्षुनी ॥
मला तें दावुनी । लाभ नसे ॥ ४६१ ॥
कापट्याच्या जाळीं । रहा तूं गुंतून ॥
नसे सत्य ज्ञान । प्रिय तुला ॥ ४६२ ॥
तरी जाण, दुष्टा । लागलें मी जरी ॥
वर्णावया थोरी । सतीत्वाची ॥ ४६३ ॥
ऐशी स्फूर्ति मनीं । माझ्या रे फुटेल ॥
वक्तृत्व वाहील । नदीतुल्य ॥ ४६४ ॥
पशु-पक्षांवरी । त्याचा अधिकार ॥
करील संस्कार । दारुण जो ॥ ४६५ ॥
धीर पृथ्वी सुद्धां । हालाया लागेल ॥
गृह हें पडेल । तुझ्या शिरीं ॥ ४६६ ॥
कोमस०—सत्य ती वदती । तच्छब्द अपार ॥
करिती संस्कार । माझ्या मनीं ॥ ४६७ ॥
दैवी बल राहे । निश्चयें तयांत ॥
अति भयभीत । झालोंसें मी ॥ ४६८ ॥

नसुनियां नर । घाली मला स्नान ॥
जलाच्या समान । शीत धर्म ॥ ४६९ ॥
ऐसी भीति वाटे । जेव्हां स्वर्ग–धनी ॥
करी मेघ–ध्वनि । अति क्रोधें ॥ ४७० ॥
तरी कासया म्यां । स्वकर्म सोडावें ॥
कां न परीक्षावे । अबले ह्या ॥ ४७१ ॥
महा यत्नें तिला । वश्य मी करीन ॥
जय मिळवीन । श्रेयस्कर ॥ ४७२ ॥
चल घे, आर्ये, ही । सुधा जी मधुर ॥
बालिश विचार । सर्व सोड ॥ ४७३ ॥
औदिसिन्यें भ्रम । झालासे तुजला ॥
अवश्य काढिला । पाहिजे तो ॥ ४७४ ॥
एक स्वाद ह्याचा । केवळ घेशील ॥
मुक्त तूं होशील । भ्रमांतुनी ॥ ४७५ ॥
आणि सुख–जलीं । मग्न तूं राहून ॥
अन्य–विस्मरण । पावशील ॥ ४७६ ॥
विचार करुनी । करीं हें प्राशन ॥
ह्यांत असे ज्ञान । परम जें ॥ ४७७ ॥

(दोघे बंधु नागव्या तरवारी घेऊन शिरतात, त्याच्या हातून पात्र घेतात, आणि जमिनीवर आपटून फोडितात, त्याचें सैन्य विरोध करण्याची चिन्हें दाखवितें, आणि रक्षक -दूत आंत येतो.)

२० दूत०—काय त्या दुष्टासी । पळावया दिलें ॥
बरवें न केलें । तुह्मी ह्यांत ॥ ४७८ ॥
दंड त्याचा तुह्मी । घ्यावयाचा होता ॥
द्यावया मुक्तता । आर्येलागीं ॥ ४७९ ॥
त्याच्या दंडावीण । अशक्य हिजला ॥
मुक्त करायाला । बंदांतून ॥ ४८० ॥
परी आशाहीन । व्हाया न कारण ॥
असे बा साधन । अन्य एक ॥ ४८१ ॥
तया उपचारें । स्वकार्य होईल ॥
मुक्तता पावेल । साधु आर्या ॥ ४८२ ॥
एका वन्य जनें । कथिला तो मला ॥
होतें नाम ज्याला । मह्लोबा हें ॥ ४८३ ॥
उत्तम गायक । होता तो चतुर ॥
शांतवी अंतर । श्रोतियांचें ॥ ४८४ ॥
तयानें कथिलें । एक दिव्य बाला ॥
रक्षी मेषपालां । अरण्यीं ह्या ॥ ४८५ ॥
राहे ती सतत । नदीच्या जलांत ॥
पूज्य जी अत्यंत । असे सर्वां ॥ ४८६ ॥
तदाचार असे । पवित्र अपार ॥
ठेवी सतींवर । महा प्रेम ॥ ४८७ ॥
सतीत्व-रक्षण । कराया आपुलें ॥
तियेनें त्यजिलें । स्वमातेसी ॥ ४८८ ॥
तिचा पाठलाग । तन्मातें जैं केला ॥
नदीतें अर्पिला । निज देह ॥ ४८९ ॥

नदींतुनी आले । दिव्य दोन हस्त ॥
होते अलंकृत । भूषणीं जे ॥ ४९० ॥
त्यांनीं तिला नेलें । वरुण–मंदिरीं ॥
उदकांत करी । राज्य जो कीं ॥ ४९१ ॥
त्यानें तिचें धैर्य । आश्चर्ये प्रेक्षून ॥
ईश्वरी जीवन । दिलें तिला ॥ ४९२ ॥
त्याच्या कन्यीं तिला । अमृतीं न्हाइलें ॥
अंजन लाविलें । नेत्रां कर्णां ॥ ४९३ ॥
दिव्य स्थिति तदा । पूर्ण ती पावली ॥
नद्यांची ती झाली । महा देवी ॥ ४९४ ॥
परी दयाशील । वृत्ति ती धरिती ॥
आणि देती मुक्ति । पीडितांसी ॥ ४९५ ॥
व्याधींतुनी मुक्त । मेषां ती करिती ॥
भूतें जें पीडिती ॥ तयांलागीं ॥ ४९६ ॥
मेषपाळ तरी । उत्सव-दिवसीं ॥
पूजिती तिजसी । गान–नादें ॥ ४९७ ॥
टाकिती तज्जलीं । गंध पुष्प--माला ॥
खाद्यें देती तिला । मधुर जीं ॥ ४९८ ॥
तिची आराधना । आतां मी करून ॥
तिचें कृपादान । मागतों हो ॥ ४९९ ॥

गीत.

कृपाळु देवते । ऐक तूं प्रार्थना ॥
दुःख-निवारणा । करितों जी ॥ ५०० ॥

त्वदीय गौरव । स्वमनीं चिंतून ॥
विनति श्रवण । करीं माझी ॥ ९०१ ॥
आसनावरूनी । उठीं तूं त्वरित ॥
आमुचें संकट । निवाराया ॥ ९०२ ॥
(देवी दासी घेऊन उठते.)
देवी०—तृणमय तीरीं । असे माझा रथ ॥
हीरकीं शोभित । अत्यंत जो ॥ ९०३ ॥
त्यामाजी बैसुनी । करीं पर्यटन ॥
जलाच्यावरून । दासींसह ॥ ९०४ ॥
भूमीवरी जरी । ठेवीं मी चरण ॥
लवे पुष्पपर्ण । कदापि न ॥ ९०५ ॥
मेषपाला, पैंहा । आलेंसें त्वत्कार्या ॥
काय करावया । इच्छिसी तूं ॥ ९०६ ॥
र०दूत०—द्विहस्त जोडोनी । प्रार्थीं मी तुजला ॥
मुक्त करायाला । स्त्रियेसी ह्या ॥ ९०७ ॥
पडली असे ती । मायाकार-जालीं ॥
पाहिजे काढिली । तिजलागीं ॥ ९०८ ॥
सतीत्वें असे ती । अपार शोभन ॥
पावाया मोचन । अति योग्य ॥ ९०९ ॥
देवी०—सती-कार्य मला । प्रियसे अपार ॥
पहा मी सत्वर । आलें असें ॥ ९१० ॥
तेजस्वी, आर्ये, तूं । लाव तव नेत्र ॥
तेजाळ अपार । मजकडे ॥ ९११ ॥

तुझ्या वक्षावर । करितें सिंचन ॥
असे महा गुण । जलांत ह्या ॥ ९१२ ॥
पडो एक बिंदु । तुझ्या ओष्ठांवर ॥
अंगुली-शिखर । भिजोतही ॥ ९१३ ॥
पाषाणासन हें । भ्रष्ट असे झालें ॥
शुद्ध तरी केलें । पाहिजे तें ॥ ९१४ ॥
स्पर्श त्या करितें । पवित्र हस्तांनीं ॥
काढाया त्यांतुनी । मंत्र–मल ॥ ९१५ ॥
मंत्र-मल असे । सकळ निघाला ॥
जावें लागे मला । आतां त्वरें ॥ ९१६ ॥

(देवी उतरते, आणि ती आर्या आसनावरून उठते.)

र०दूत०—दिव्य जल-देवी । तव उपकार ॥
झाले आह्मांवर । महा थोर ॥ ९१७ ॥
तुझ्या नद्यांमध्यें । राहो सदा जल ॥
विपुल, निर्मल । हितकारी ॥ ९१८ ॥
गगन-चुंबित । पर्वतांवरून ॥
प्रवाह दारुण । येवोत गे ॥ ९१९ ॥
उडत नाचत । गर्जना करीत ॥
गाढ ते भरोत । तव पात्र ॥ ९२० ॥
येवोत त्वत्तीरीं । तुझ्या जलांतून ॥
हीरक व स्वर्ण । अनुपम ॥ ९२१ ॥
अट्ट व मंदिरें । उच्च तरुवर ॥
शोभोत अपार । तव तटीं ॥ ९२२ ॥

पुष्पांचा सुगंध । प्रसरो सर्वत्र ॥
वायूंच्या मधुर । स्वरांसह ॥ १२३ ॥

(आर्येसी बोलतो)

चल ये तूं, आर्ये । त्वरित एथून ॥
जावया निघोन । अवश्यसे ॥ १२४ ॥
कदापि तो चेष्टा । अन्य त्या करून ॥
लागेल प्रयत्न । करावया ॥ १२५ ॥
मूक राहा पूर्ण । अपूत हें स्थान ॥
योग्य न भाषण । करावया ॥ १२६ ॥
वनांतुनी तुला । त्वन्मार्ग दावून ॥
निर्भय नेईन । गृहाप्रति ॥ १२७ ॥
तेथें तुझ्या दृष्टीं । सत्य पडतील ॥
त्वदाप्त सकळ । एकत्र ते ॥ १२८ ॥
महा उत्सव ते । आज गे करिती ॥
निज–स्वामि–भक्ति । दावायासी ॥ १२९ ॥
ग्राम्य जन सुद्धां । आज प्रेक्षिशील ॥
सर्व जे येतील । नाचायास ॥ १३० ॥
अशा शुभ काळीं । जाऊं त्वत्सदनीं ॥
चकित करुनी । टाकूं सर्वां ॥ १३१ ॥
त्वरा करीं कृपें । नक्षत्रें धरिती ॥
निज-दीप-ज्योति । गगनांत ॥ १३२ ॥

(शहर व वाडा दृष्टीस पडतो. ग्राम्य जन गात येती, त्यांच्या मागून रक्षक जातो.)

र० दूत०—अल्पकाळ स्तब्ध । करा हो गायन ॥
येती थोर जन । गृहाप्रति ॥ ९३३ ॥
(मातापितरांस त्यांचीं बालकें भेटवितो.)

गीत.

श्रेष्ट आर्यांनों हा । आनंद नवीन ॥
केलासे निर्माण । तुझांलागीं ॥ ९३४ ॥
तुमच्या त्रिशाखा * । वृद्धि हो पावून ॥
अपार शोभन । दिसताती ॥ ९३५ ॥
देवें त्यां निकषा । लावुनी पाहिलें ॥
असती पावले । कृपे त्याच्या ॥ ९३६ ॥
त्यांचें धैर्य स्पष्ट । उदयासी आलें ॥
कीर्त्तिमान झाले । असती ते ॥ ९३७ ॥
विजयांच्या माना । योग्य ते ठरती ॥
देहा जे ठेविती । निजपदीं ॥ ९३८ ॥
(रक्षक-दूताचें शेवटचें भाषण)
सागरीं, गगनीं । करीं मी गमन ॥
दिन जया स्थानीं । राहे सदा ॥ ९३९ ॥
तेथें शुद्ध वायु । प्राशन करितों ॥
उद्यानीं भ्रमतों । देवतांच्या ॥ ९४० ॥
वसंत ह्या स्थळीं । सुदानें वर्षितो ॥
गंध प्रसरितो । स्वपक्षांनीं ॥ ९४१ ॥

---

* तीन बाळें.

आसन करितो । शुक्र तया स्थानीं ॥
धारण करूनी । दिव्य वस्त्रें ॥ ९४२ ॥
देवें कार्य जें कीं । मातें आज्ञापिलें ॥
पूर्णसें म्यां केलें । विनयें तें ॥ ९४३ ॥
तरी गमन मी । करितों स्वदेशीं ॥
आस्थें करायासी । निजोद्योग ॥ ९४४ ॥
साम्य मातें कोणी । इच्छिती पावाया ॥
अवश्यसे तयां । सयंमन ॥ ९४९ ॥
करितील तेची । गगनीं उड्डान ॥
सुखद वासन । तारांगणीं ॥ ९४६ ॥
जरी ते असले । दीन व दुर्बल ॥
यश त्यां देईल । देवराय ॥ ९४७ ॥

समाप्त.